**दिनांक : २५/१०/२४**

**विषय : स्प्लिट फ्लॅट्स तसेच अधिक ची जागा घेण्याऱ्या सभासदांवर पडणारा संभावित आर्थिक बोझा.**

काल दिनांक २४/१०/२४ रोजी संस्थे च्या पुनर्निर्माण प्रकल्पात ज्या सभासदांनी स्प्लिट फ्लॅट्स ची तसेच ज्यांनी त्यांना मिळणाऱ्या जागे पेक्षा मोठ्या जागे ची मागणी केली आहे त्या सर्व सभासदांना त्या साठी लागणारा अतिरिक्त आर्थिक बोजा किती असेल ह्याचा अंदाज देण्या करिता एक मेळावा आपल्या समाज मंदिरात आयोजित करण्यात आला होता. मेळाव्याला ६७ सभासद आणि त्यांचे कुटुंबीय उपस्थित होते.

सर्व प्रथम उपस्थितांचे स्वागत करून संस्थे चे सचिव श्री विनायक पटवर्धन यांनी मेळाव्याचे उद्दीष्ट सांगितले. नंतर पंच समिती सदस्य श्री विजय लेले यांनी सदस्यांच्या मागण्यांची सविस्तर माहिती दिली तसेच प्रत्येकाला किती आर्थिक तरतूद करावी लागेल हे साउदाहरण विषद केले. त्यांनी हे स्पष्ट केले की ह्या पुढे सभासदांनकडून नवीन बदल स्वीकारता येणार नाही.

हा संभावित आर्थिक बोजा खालील प्रमाणे असेल.

* स्प्लिट फ्लॅट्स - रू. ५.५० लाख बांधकाम खर्च (बिल्डर ला देय) + रू. ७.० लाख (सोसायटी ला देय). एकूण रू. १२.५० लाख.

** अधिक ची जागा -
१. जर एकच मोठा फ्लॅट असेल तर मिळणाऱ्या जागे पेक्षा अधिक च्या जागे साठी पहिल्या १०० वफु (सेलेबल साठी) रू. १३०००/ वफु भावाने आणि त्या पुढे त्या वेळेस असणाऱ्या बाजार भावाप्रमाणे, जो जवळ पास रू. १८०००/ प्रती वफु (सेलेबल साठी) असेल असा अंदाज आहे.

२. जर दोन फ्लॅट्स असतील तर वरील * प्रमाणे रू. १२.५० लाख. + मिळणाऱ्या जागे पेक्षा अधिक च्या जागे साठी पहिल्या १०० वफू (सेलेबल साठी) रू. १३०००/ वफू भावाने आणि त्या पुढे त्या वेळेस असणाऱ्या बाजार भावाप्रमाणे, जो जवळपास रू. १८०००/ वफु (सेलेबल साठी) च्या घरात असेल असा अंदाज आहे.

3. सचिवांनी हे ही सूचित केले की स्प्लिट युनिट मधे विकसकाला देय रू. ५.५० लाख Betterment Charges मधून वजा करता येतील.

*** वरील आर्थिक खर्चा व्यतरिक्त कॉर्पस फंड सोडून सगळ्या रकमेवर त्या वेळेस लागू असलेली स्टॅम्प ड्यूटी, रजिस्त्रेशन फी आणि जी एस टी पण देय असेल.

ह्या मेळाव्यात आर्थिक तरतुदींचा विचार करून ज्या सभासदांना त्यांच्या फ्लॅट च्या निवडीत काही बदल करायचे होते त्यांच्या कडून त्या आशयाचा एक फॉर्म पण भरून घेण्यात आला.
सचिवांनी सांगितले की आता फायनल झालेली ही मागणी बिल्डर ला देण्यात येईल आणि त्या प्रमाणे तो हे बदल कसे accomodate करतो ते कळवेळ.

मेळाव्यात सभासदांनी विचारलेल्या प्रश्नांची समाधानकारक उत्तरे ही देण्यात आली. सर्वांचे आभार मानून अध्यक्ष श्री विजय सावंत यांनी मेळावा संपल्याचे जाहीर केले.

पंच समितीच्या वतीने